पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २७/०४/२०१९

## दोन जहाल महिला माओवादी ठार

दिनांक २२ व २३ एप्रिल २०१८ रोजी गडचिरोली पोलीस दलाने ४० नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले होते. नक्षलविरोधी कारवाईचे हे सर्वोच्च यश असुन त्यास वर्षपुर्ती होत असल्याने नक्षलवाद्यांनी २२ एप्रिल ते २८ एप्रिल २०१९ या काळात दुर्गम गावांमध्ये पत्रके वाटुन बंदचे आवाहन केले होते. यामुळे गडचिरोली पोलीस दलाव्दारे मा. पोलीस अधिक्षक, श्री शैलेश बलकवडे सा़े. यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले होते.

आज रोजी उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या गुंडुरवाही ते फुलणार जंगल परिसरात सी-60 चे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दुपारी १२ ते ०१ वा. चे दरम्यान नक्षलवादयांनी पोलीसांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने भुसुरुंगाचा स्फोट घडवुन आणला. यानंतर नक्षलवाद्यांनी पोलीसांवर गोळीबार सुरु केला. प्रत्युत्तरादाखल व स्वसंरक्षणार्थ पोलीसांनी नक्षलवाद्यांच्या दिशेने गोळीबार केला असता नक्षलवाद्यांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत तेथून पळ काढला.

घटनेनंतर सदर जंगल परिसरात शोध मोहिम राबविली असता दोन महिला माओवादी मृतावस्थेत मिळुन आल्या आहेत. मृत महिला माओवादयांची ओळख पटली असुन त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

१) रामको उर्फ कमला मनकु नरोटे वय. ४६ वर्षे हि गट्टा दलम मध्ये डिव्हीजनल कमिटी मेंबर पदावर कार्यरत होती. तिचा भामरागड व गट्टा जंगल परिसरात पोलीसांविरोधी घातपाताच्या दृष्टिने केलेल्या अनेक कारवायांमध्ये सक्रिय सहभाग असल्याने गडचिरोली पोलीस दलास मिळालेले हे मोठे यश मानले जात आहे. तिचेवर महाराष्ट्र शासनाने १६ लाख रु. बक्षीस जाहिर केले होते.

२) शिल्पा उफ कोटे उर्फ मनु दसरु दुर्वा वय. २९ वर्षे हि भामरागड दलम मध्ये सदस्य म्हणुन कार्यरत होती. तिचेवर महाराष्ट्र शासनाने ०४ लाख रु. बक्षीस जाहिर केले होते.

सदर घटनेनंतर नक्षलविरोधी अभियान तिव्र करण्यात आले आहे.